आठवणीतलं ठाणं

# आजी सापडली !



दिल्ली आर्ट गॅलरीतर्फे नेहरू सेंटरमध्ये सध्या सुरू असलेल्या चित्रप्रदर्शनातील चित्रकार ल.ना.तासकर यांनी साकारलेलं आपल्या पत्नीचं हेच ते तैलचित्र.

● माधव गडकरी

अखिल भारतीय कीर्तीचे चित्रकार लक्ष्मण नारायण तासकर यांचे एकेकाळी ठाण्यात गोखले रोडवर दुमजली घर होत. वरच्या मजल्यावरचा दिवाणखाना तैलचित्रांनी भरलेला होता. चारुदत्त-वसंतसेनेच्या एका भव्य चित्रानं अर्धी भिंत व्यापली होती. चारुदत्ताला फासावर चढविण्यासाठी उभा केलेला आहे, आणि त्याला सोडविण्यासाठी वसंतसेना तिथे आली आहे, असं ते दृश्य कितीतरी वेळ पाहात त्यावेळी मी उभा राहिलेलो आहे. वरती एका भव्य मंदिराचे चित्र हाते. स्त्री-पुरुषांची शरीरं, त्यांच्या अंगावरील विविध वस्त्रं, त्यांच्या केशभूषा, त्यांचा रेखीवपणा नजरेत भरणारा असे. बाजूच्याच भिंतीवर ल. ना. तासकर यांनी स्वतःचे आणि पत्नीचे अशी काढलेली दोन भव्य तैलचित्रे लावलेली होती. गोखले रोडवरून रस्त्याने जाता-येता ती दिसत.



ल. ना. तासकर आणि लक्ष्मीबाई तासकर यांची कन्या मंजू ही माझी आई. ते सर्व वडिलांना दादा म्हणत. गोरेपान असे दादा त्या वरच्या मजल्यावरील आतील खोलीत चित्रे काढण्यात मग्न बसलेले मी स्वतः अनेकदा पाहिले आहेत.

ते दिवस निघून गेले. दादा गेले, त्यांचे चिरंजीव श्रीधर लक्ष्मण तासकर गेले. तेही चित्रकार आणि आर. एम. भट हायस्कूलचे प्रमुख. एक दिवस ते घरही पाडले गले. आमचे ठाणे सुटले होते. यमुनेपासून मांडवीपर्यंतचे कितीतरी पाणी वाहून जाताना मी पाहिले. आणि आता दोन वर्षांपूर्वी मला दिल्लीच्या एका आर्ट गॅलरीकडून टेलिफोन येऊ लागले, 'तुम्ही तासकरांचे नातेवाईक आहात ना ?'

मी 'हो' म्हटले. अबुताई धुरंधरांनी (चित्रकार धुरंधरांच्या कन्या) यांनी त्यांना माहिती दिली होती.

'भारताच्या चित्रकारांबद्दलच्या अल्बममध्ये चित्रकार तासकर कुठेच नाहीत. तुम्ही त्यांची माहिती द्यावी.' तेव्हा मी माझ्या आजोबांचे चित्र व सविस्तर माहिती दिल्लीला पाठविली.

पान २ वर



# आजी सापडली !

पान १ वरून

दिल्ली आर्ट गॅलरीचा तो अल्बम आज माझ्याकडे आहे. त्यात चित्रकार तासकर आहेत, त्यांच्या दोन चित्रांची छायाचित्रेही आहेत.

नंतर फोन येतच राहिले. हे चित्र ... आहे, कधी काढलेले ... हे, अशी विचारणा ते करीत ... ती त्याला अधिक ... ना... मानभाऊ कॅप्टन ... तासकर हा आजा... हो.

... दिल्लीहून टपालात ... चित्राचे छायाचित्र ...माझ्याकडे आले. 'हे कोणाचे ...आहे ?' हा प्रश्न होता. मला आश्चर्य वाटले. ते चित्र माझ्या आजीचे होते. तासकर पती-पत्नींची जी दोन भव्य तैलचित्रे दिवाणखान्यात होती, त्यापैकी आजीचं तैलचित्र होते.

ते तुमच्याकडे कसे आले ? साहजिकच मी विचारले. घर पडल्यावर ती सर्व चित्रे विकली गेली होती. आजी-आजोबांची तैलचित्रे काढणाऱ्यांचीच चित्रे विकली गेली होती आणि दिल्लीपासून जगभर फिरत होती.

आजीचे ते तैलचित्र पाहिल्यावर सर्व लहानपण आठवले आणि निदान आजी-आजोबांची चित्रे राहायला हवी होती, असं वाटले.

मी माहिती पाठविली. दिल्लीहून एक दिवस फोन आला. मुंबईत प्रदर्शन आहे, तेव्हा श्रीमती तासकरांचे हे तैलचित्र, तेथे लावले जाईल तर तुम्ही या. त्याप्रमाणे दिनांक सहा एप्रिल रोजी मुंबईच्या नेहरू सेंटरमध्ये दिल्ली आर्ट गॅलरीने आयोजित केलेले ते भव्य प्रदर्शन पाहण्यास आम्ही सारी नातवंडे जाऊन



ठाण्यातील तासकरांचं हेच ते जुनं घर. आता तिथे टोलेजंग इमारत उभी आहे.

उभी राहिलो. आणि खरोखरच हरवलेली आमची आजी आम्हाला सापडली. लक्ष्मीबाई नारायण तासकर याचे चित्रकार तासकरांनी काढलेले ते तैलचित्र प्रदर्शनात दिव्यांच्या प्रकाशात चमकत होते.

आम्ही सारे भक्तिभावाने उभे राहिलो. माझ्या मामेबहिणी, श्री ल. तासकरांच्या तिन्ही कन्या आपल्या मुलांसह आल्या होत्या. या आजीने आमच्या हातावर खडीसाखर ठेवली होती. तिच्या तैलचित्राला आसरा राहिला नव्हता.

अजूनही आजोबांना शोधायचे आहे. ल. ना. तासकरांचे स्वतः काढलेले भव्य तैलचित्र औंधच्या म्युझियममध्ये आहे, असे कुणी सांगितले. मी अजून ते पाहिलेले नाही.

दोघांना एकदा आणायला हवे. व्यवहारी जगात ते आता कसे साध्य होणार ?

तूर्त आजी भेटल्याच्या आनंदात आम्ही सारे आहोत.